रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सदर बाजार हद्दीतील अवैध धंद्यावर डीवायएसपी पथकाची धडक

# सदर बाजार ठाणे पोलिसांची निष्क्रीयता उघड

जालना । प्रतिनिधी - उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांच्या पथकाने शनिवार (दि ०६ डिसेंबर २०२५) सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली. ही कारवाई उपविभागीय पथकाला करावी लागल्यामुळे सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची निष्क्रीयता उघड झाली आहे. सदर बाजार पोलीसांकडून वसुलीची छुपी परंपरा या घटनेमुळे अधिक ठळक झाली आहे.

**सदर बाजार पोलीस ठाण्याच्या निष्क्रीयता**

शहरातील गरीबशाह बाजार परिसरात अनेक दिवसांपासून अवैध म टका व्यवहार जोमात सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत होत्या. म ात्र स्थानिक पोलीसांनी याकडे दुर्लक्ष केल्याने आणि कारवाई न झाल्याने उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाला थेट छापा टाकावा लागला. यामुळे सदर बाजार पोलीस ठाणे नेमकं काय करतं? असा सवाल शहरात जोरात आहे.

### सदर बाजार पोलीस ठाण्याची ‘परेड’ घेण्याची गरज!

स्थानिक गुन्हे दाबण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांना बाहेरील पथकाने धडा शिकवावा लागतो, हे अत्यंत गंभीर आहे. नागरिकांच्या मते सदर बाजार पोलीस ठाणे नेमकं कोणाच्या दबावाखाली आहे? कोणाच्या संरक्षणाखाली अवैध धंदे फोफावतात? डीवायएसपी पथकाच्या कारवाईनंतर आता संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कठोर चौकशी करण्याची मागणी वाढत आहे.

**डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांचे स्वतंत्र पथक आणि छापा**

डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांनी विशेष म ोहीम राबवण्यासाठी स्वतंत्र पथक नेमून गरीबशाह बाजार परिसरात कारवाईस आदेश दिले. पथकाने हॉटेल शितल बार समोर पत्राच्या शेडमध्ये चालू असलेला कल्याण मटका, टाईम बाजार मटका, मिलन बाजार मटका सुरू असल्याची खात्री करून अचूक छापा टाकला.

छाप्यात आरोपी सुरेश वामनराव शेळके, रा. अमृतनगर, देवळगाव राजा (जि. बुलढाणा) हा नागरिकांना आमिष दाखवून मटका खेळवतांना पकडला. चौकशीत त्याने सांगितले की तो हा अवैध मटका व्यवसाय पवन रामलाल फत्तेलष्करी, रा. मंगळ बाजार, जालना यांच्या सांगण्यावरून करत आहे. त्याच्याकडून मटका चिटबुक, कार्बन, पेन, रोकड रु १४,२७०/- असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपविभागीय पथकातील पोना/१४४० आर. चव्हाण यांच्या फिर्यादीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**सदर बाजार पोलीस ठाण्यावर निष्क्रीयतेची छाया**

अवैध मटका व्यवसाय शहराच्या मध्यवर्ती भागात हॉटेलच्या समोर, सार्वजनिक जागी चालू असतांना स्थानिक पोलीसांनी तो रोखण्यासाठी कारवाई न करणे गंभीर दुर्लक्ष आणि भूमिकेवर प्रश्न निर्माण करणारे आहे. शहरात सुरू असलेल्या चर्चेनुसार, मटका व्यवहार उघड्यावर सुरू असतो तरी पोलीस दखल घेत नाहीत.

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांकडून अशा अवैध धंद्यांवाल्यांकडून नियमित वसुलीच्या आरोपांची चर्चा आहे. त्यामुळे अशा कारवाया टाळल्या जातात. अशा परिस्थिती विभागीय पथक, पोलीस अधिक्षकांचे पथक यांच्याकडून विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील पाहणी-चाचपणी करून अशा कारवाया कराव्यात अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे. पोलीस ठाणे हद्दी बाहेरील पथकाची वाट पाहण्याची ही परिस्थिती सदर बाजार पोलीस ठाण्यावर प्रश्नचिन्ह उभे करते.



**उपविभागीय पथकाची कारवाई कौतुकास्पद**

ही कारवाई पोलीस अधिक्षक अजयकुमाल बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. हरीश राठोड, पोहेकॉ महेश वांगे, पोना आर. चव्हाण, पोना हरुणखो पठाण (उपविभागीय कार्यालय जालना) यांनी पार पाडली.

---

युवा आदर्श

कट्टा ...

**निवडणूक निकाल**
**रंगतो गप्पा कट्टा**
**व्यक्त होतो संशय**
**लागला का रे सट्टा**
**हरला का अवचित**
**पक्ष असा धट्टकट्टा**
**अकले प्रमाणे तर्क**
**चालतो तोंडा पट्टा**
**जयघोषाला तयार**
**करु मस्त नट्टापट्टा**
**मिळाला नाही जय**
**आनंद सगळा खट्टा**
**साजरे कराया जय**
**तयार बांधूनि फेटा**
**मौसम झाला पलटा**
**निकाल होई उलटा**
**चुकीचे घडले काय**
**कळत नसते माठा**
**गडबड केली नक्की**
**अपप्रचार का खोटा**
**कारणे शोधणेसाठी**
**लाखो हजारो वाटा**
**विचारतात निलाजरे**
**तुमचा केवढा वाटा**
**मन करता विशाल**
**पराजय वाटे छोटा**
**मनोबल घट्ट करता**
**संसार नव्याने थाटा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# नैसर्गीक अनुदान घोटाळ्यातील तलाठी किरण जाधव ताब्यात

## आर्थिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीच्या अनुदानामध्ये झालेल्या कोट्यवधींच्या घोटाळ्यात आणखी एक मोठी कारवाई झाली आहे. तलाठी किरण रविंद्र जाधव याला आर्थिक गुन्हे शाखेने छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली असून या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता नऊ वर पोहोचली आहे. ही कारवाई संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत असून, शासनाच्या आपत्ती अनुदानाच्या रकमेचा असा मोठ्या प्रमाणात अपहार कसा झाला याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**नैसर्गीक आपत्ती अनुदान घोटाळा : २४.९० कोटींचा अपहार उघड**

अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या पिकांच्या नुकसानानंतर शासनाने जाहीर केलेल्या अनुदानामध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस शेतकऱ्यांची नावे अपलोड करून अनुदानाची रक्कम काढून घेतल्याची गंभीर तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे झाली होती. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती गठीत केली. समितीच्या तपासणीत एकूण २४० गावांमध्ये रु २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय निधीचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले. इतक्या प्रचंड रकमेच्या भ्रष्टाचारात तांत्रिक माहिती अपलोड करणारे अधिकारी-कर्मचारी आणि काही स्थानिक जणांचा संगनमताने सहभाग असल्याचे पुरावे तपासात पुढे आले.

चौकशी अहवाल आल्यानंतर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ अंतर्गत खालील कलम ांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) BNS सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ प्रकरणाचा तपास ड्झ जालना यांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

तपासादरम्यान आधीच ८ आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र तलाठी किरण रविंद्र जाधव (वय ३६), निवासी देऊळगाव राजा, ह.मु. अंबड हा गेल्या काही दिवसांपासून फरार होता. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचा शोध घेत छत्रपती संभाजीनगर येथे सापळा रचून त्याला पकडण्यात यश मिळवले.

त्यामुळे या प्रकरणातील अटकांची संख्या आता एकूण ९ झाली आहे. उर्वरित फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके कार्यरत आहेत.

**आर्थिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी**

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, प्रभारी पोलली उपअधिक्षक सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली PI मिथुन घुगे, पोलीस अंमलदार - गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांच्या पथकाने केली.

**पुढील तपास आणखी मोठे खुलासे करणार?**

या घोटाळ्यात कोणाचे संरक्षण मिळाले?, कोणते अधिकारी मूळ सूत्रधार?, अनुदान वितरणाचा संपूर्ण सिस्टीम कसा दुरुपयोग झाला? या प्रश्नांची उत्तरे पुढील तपासातून मिळण्याची शक्यता आहे.

---

# ‘छंदाकडून व्यवसाय कडे’

## एस .बी. जालना शाळेत कार्यशाळा संपन्न!

**जालना । प्रतिनिधी** - नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्यावर आधारित शिक्षण ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या क्षमता ओळखून त्याचा विकास करणे गरजेचे आहे. असे कौशल्यावर आधारित अनेक उपक्रम प्रशालेमध्ये आयोजित केले जातात. असाच एक अनोखा उपक्रम जालना येथील सरस्वती भुवन प्रशालेतील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती बिना पाठक यांच्या संकल्पनेतून आज दि. ६/१२/२०२५ रोजी प्रशालेम ध्ये आयोजित करण्यात आला होता. 'बॅडमिंटनचे रॅकेट' विणण्याची कार्यशाळा प्रशालेत घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी आदर्श विद्यालय, सायगाव (डों.) येथील श्री. राजेभाऊ मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मुख्याध्यापक श्री .एम. एस बिरहारे , उपमुख्याध्यापक श्री.युवराज पाडळे आणि ज्येष्ठ शिक्षक श्री.देशमुख इत्यादींची उपस्थिती होती.



यावेळी श्री. राजेभाऊ मगर यांनी विद्यार्थ्यांना बॅडमिंटनची रॅकेट विणण्याचे कौशल्य शिकवले. तसेच हे कौशल्य शिकतांना काय काय काळजी घ्यावी आणि या बॅडमिंटन विणूणं स्व कष्टाने कमावलेल्या पैशातून शैक्षणिक खर्च भागवा असा सल्ला श्री.मगर यांनी दिला . तर प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी म नोगत व्यक्त केले व आम्हाला हा कार्यक्रम खूप आवडला असून आम्ही नक्कीच याचे व्यवसायामध्ये रूपांतर करू अशी ग्वाही दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक **पान २ वर**

---

# सहकारी बँकांचे भवितव्य धोक्यात?

## देवस्थानाच्या पैशांवरून सर्वोच्च न्यायालयाचे कठोर ताशेरे

**जालना । प्रतिनिधी** - मंदिराचा पैसा हा देवतेचा असतो आणि तो अडचणीत असलेल्या सहकारी बँकांना वाचवण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही, अशा कठोर शब्दात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच एका प्रकरणात निरीक्षण नोंदवले आहे. केरळमधील थिरुनेल्ली मंदिर देवस्वमच्या ठेवी परत करण्याच्या केरळ उच्च न्यायालयाच्या निर्देशाला आव्हान देणाऱ्या काही सहकारी बँकांच्या याचिका फेटाळताना सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने हे महत्त्वपूर्ण मत व्यक्त केले.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मंदिराच्या पैशांची बचत, संरक्षण आणि वापर केवळ मंदिराच्या हितासाठीच व्हायला हवा. तो कोणत्याही सहकारी बँकेच्या उत्पन्नाचा किंवा जगण्याचा स्रोत बनू शकत नाही. तुम्हाला बँकेला वाचवण्यासाठी मंदिराचा पैसा वापरायचा आहे का? मंदिराचा पैसा, जो मोठ्या कष्टाने श्वास घेत असलेल्या सहकारी बँकेत ठेवण्याऐवजी, जास्तीत जास्त व्याज देऊ शकणाऱ्या निरोगी राष्ट्रीयकृत बँकेत जायला हवा, या (उच्च न्यायालयाच्या) निर्देशात काय चुकीचे आहे? असा थेट सवाल सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्या बँकांना केला.

या पार्श्वभूमीवर, नोटरी असोसिएशन, जालनाचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. महेश धन्नावत यांनी महाराष्ट्रातील **पान २ वर**

---

# शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार रुजविणे सर्वांची जबाबदारी-बळीराम गिते

**जालना । प्रतिनिधी** - शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये आणि मूल्य सुसंस्कार रुजविणे सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी तथा अकोला निकळक येथील रहिवासी बळीराम गिते यांनी केले.

सेलगाव (ता. बदनापूर) येथील अण्णासाहेब दत्ताभाऊ पाथ्रीकर विद्यालयात शिक्षकांसाठी आयोजित तालुकास्तरीय मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेच्या चौथ्या टप्प्याचे उद्घाटन गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी झाले, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून श्री. गीते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, माणूस शेवटपर्यंत विद्यार्थी राहिला तरच तो ज्ञानाच्या सागरात खोलवर जाऊ शकतो. शिक्षकांनी नेहमी शिकत राहणे गरजेचे आहे. स्वतः शिकणे सोपे आहे पण दुसऱ्याला शिकवणे ही एक कला आहे. बुद्धीला सत्याकडे, मनाला भावनेकडे आणि शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण, असे स्वामी विवेकानंद म्हणत असत. समाजात शिक्षकांचे स्थान खूप मोठे आहे जर शिक्षक दिसल्यावर विद्यार्थी जवळ येत असतील तर समजायचे की आपण त्यांना काहीतरी मूल्य दिले आहे, असे श्री. गीते म्हणाले.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या श्रीमती देशमुख, डॉ. प्रमोद कुमावत, डॉ. जहागिरदार यांनीही प्रशिक्षणाला भेट देऊन मार्गदर्शन केले. प्रशिक्षण प्रमुख डॉ. प्रेरणा मोरे, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन तथा सुलभक मार्गदर्शक जगत घुगे, केंद्रप्रमुख विकास पाथरे, संजय हेरकर, दिलीप अंभोरे, शिवाजी बांदल, एन. आर. चव्हाण, श्री दावणगावकर, **पान २ वर**

# संपादकीय पान

## फास्टफुड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# जेथे नाम तेथे माझे प्राण

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव दि. ५ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत गोंदवले येथे मोठ्या उत्साहाने संपन्न होत आहे. दरवर्षीप्रमाणे कोठीपूजनाने उत्सवाचा शुभारंभ दि ५ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या दहा दिवसाच्या कार्यक्रमात अखंड रामनाम नामजप, विष्णुसहस्रनाम, लघु रुद्र, तसेच दररोज गायन आणि भजन प्रवचनाचे कार्यक्रम संपन्न होत असतात. या वर्षीही राहुल देशपांडे, महेश काळे, संपदा माने कदम, श्रुती सडोलीकर काटकर, आदी मान्यवरांचे गायन तसेच श्रेयस बडवे, मोहकबुवा रायकर, रामदास आचार्य, सुहास देशपांडे, आदी मान्यवरांच भजन पकिर्तन असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. अशा विविध कार्यक्रमांनी आणि नामजपाने गोंदवलेची भूमी दुमदुमून जाते. हजारो ने भावीक या ठिकाणी आपली हजेरी लावतात आणि मोठ्या भक्तीभावाने सहभागी होतात. दुरून दुरून या कार्यक्रमासयेतात. भाविक दहा दिवस येथे मुक्कामी असतात.दहा दिवसांची सेवा मागून घेतात.

मार्गशीर्ष कृष्ण दशमी या दिवशी सकाळी पाच वाजून ५५ मिनिटांनी गुलालाचा कार्यक्रम होतो आणि महाप्रसादा नंतर त्याच दिवशी पुण्यतिथी उत्सवाची सांगता होते. यावर्षी १४ डिसेंबर ०२५ रविवार रोजी हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे होऊन गेलेल्या श्री ज्ञानेश्वरमहाराज, श्री तुकाराममहाराज, श्री समर्थ रामदास स्वामी व श्री एकनाथ महाराज आदि संताच्या मांदियाळीत शोभून दिसतील, अशा संतांपैकी एक म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर! त्यांची जन्मभूमी म्हणजे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील गोंदवले बुद्रुक हे छोटेसे गाव. पण त्यांच्या जन्माने आणि वास्तव्याने आज महाराष्ट्रातच काय पण साऱ्या भारतातही ते पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिध्द् आहे.

काय वर्णू आता गोंदवल्याची ख्याती
जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती....
शांती सुखाचे जणू हे माहेर
अष्ट प्रहर येथे नामाचा गजर
रामनामी पावन झाली इथली माती
जेथे प्रगटली चैतन्य मूर्ती......

असे ज्या गोंदवलेचे वर्णन केले जाते आणि जेथे अखंड

राम नामाचा जप सुरू असतो, भाविकांचा दर्शनासाठी ओघ असतो. अशी ही गोंदवले नगरी म्हणजे संतांची भूमीच आहे.

श्री महाराजांच्या घराण्यात पंढरीची भक्ति आणि वारी सात पिढ्या चालत आलेली होती. अशा या सात्त्विक कुटुंबात रावजी आणि सौ . गीताबाई या जोडप्याचे पोटी बुधवार माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (इ.स.१९ फेब्रुवारी १८४५) या दिवशी सूर्योदयाच्या सुमारास श्रीमहाराजांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा लिंगोपंत आणि सौ. राधाबाई यांना तर अत्यानंद झाला. पाळण्यात नाव गणपति असे ठेवले. हे गौरवर्णी गुटगुटीत आनंदी बाळ साहजिकच सर्वप्रिय झाले. बाळ थोडे मोठे होताच त्याच्या अंगचे अलौकिक गुण प्रकट होऊ लागले. भगवद्भजनाची अतोनात आवड, एकपाठीपणा, तसेच अन्नदानाचे अतीव प्रेम आणि दीनदुबळ्यांचा कळवळा पाहून आजोबा धन्य झाले.

पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली. अध्यात्माची ओढ वाढतच होती, आणि अखेर नवव्या वर्षीच दोन सोबत्यांसह गणूने गुरुशोधार्थ घरातून पलायन केले . पण त्यांचा लवकरच शोध लागला आणि हा प्रयत्न विफल झाला. अकराव्या वर्षी गणूचा विवाह करण्यात आला . त्यानंतर लवकरच आजी व आजोबा दोघेही स्वर्गवासी झाले. पुढे योग्य वेळी मुंज झाल्यावर गणूने उपाध्यायांकडून त्यांची सारी विद्या अगदी अल्पावधीतच आत्मसात केली.

इकडे गुरुभेटीची तळमळ वाढतच होती. त्यांच्या ठिकाणी जन्मत:च अत्यंत तीव्र अध्यात्म वृत्ती होती. व श्री एकनाथ व श्री समर्थ यांच्याप्रमाणे अगदी लहानपणापासून आपल्या जीवित कार्याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. ब्रह्मज्ञानाचे आपले ध्येय गाठण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. व अखेर, वयाच्या बाराव्या वर्षी आईला किंचितशी सूचना देऊन स्वारीने एके रात्री गुपचूप फक्त एका लंगोटीनिशी प्रयाण केले, आणि गुरुशोधार्थ भारतभ्रमण सुरु केले.

या भ्रमणात श्रीमहाराजांनी तत्कालीन बहुतेक संतांच्या भेटी घेतल्या. हरिपूर (सांगली) येथील साध्वी राधाबाई, मिरजेचे सत्पुरुष आण्णाबुवा, सटाण्याचे देव मामलेदार, अक्कलकोटचे श्रीस्वामी , हुमणाबादचे माणिक प्रभु , काशीचे तैलंगस्वामी, दक्षिणेश्वरचे श्रीरामकृष्ण परमहंस, आदि सर्वांनी अतिप्रेमाने त्यांना जवळ केले, पण 'तुझे गुरुपद माझेकडे नाही' म्हणून सांगितले. अखेर गोदातीरी श्रीसमर्थसंप्रदायी श्रीरामकृष्ण यांनी दर्शन देऊन येहळेगांवच्या श्रीतुकारामचैतन्यांकडे जाण्यास सांगितले. तेथे गेल्यावर मात्र त्यांना पूर्ण समाधान झाले. नऊ महिने तेथे त्यांनी अविरत, अविश्रांत गुरुसेवा केली. गुरूंनी खडतर कसोट्या घेऊन त्यांची देहबुद्धि पूर्णपणे नष्ट झाल्याची खात्री करून घेतली, अखेर संतुष्ट होऊन अनुग्रह केला आणि ब्रह्मचैतन्य असे नाव ठेवले. मनासारखा सद्गुरु भेटल्यावर त्याने सांगितलेल्या मार्गाने जाऊन वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी त्यांनी पूर्ण सिद्धावस्था प्राप्त करून घेतली. 'आत्मज्ञान अंगी मुरविण्यासाठी दोन वर्षे नैमिषारण्यात आत्मचिंतनासाठी जावे आणि मुख्य तीर्थक्षेत्र करून मग घरी जावे' ही गुरुआज्ञा शिरसावंद्य करून ते निघाले

श्री तुकामाईंच्या सांगण्याप्रमाणे तीर्थाटन करून ९ वर्षांनी गोंदवल्यास जाऊन घरी प्रकट झाले. सर्वांना आनंदीआनंद झाला. नऊ वर्षे आपली वाट पाहणाऱ्या पत्नीला ते माहेराहून घेऊन आले. पुढे तिच्यासह पुनः गुरुदर्शनास गेले, आणि नाशिक येथे सुमारे सहा महिने वास्तव्य करून त्यांनी तिची नामस्मरणात व ध्यानधारणेत उत्कृष्ट तयारी करून घेतली. वर्षभरानंतर तिला पुत्ररत्न झाले, पण लवकरच तो मुलगा देवाघरी गेला, आणि पाठोपाठ ती स्वतःही वैकुंठवासी झाली. त्यानंतर काही काळाने आईच्या आग्रहाखातर त्यांनी पुनः विवाह केला, तो एका जन्मांध मुलीशी! यांना पुढे भक्तमंडळी 'आईसाहेब 'म्हणू लागली. पुढील काळात श्रीमहाराजांनी श्रीरामनामाचा प्रसार करण्याचे व सामान्य प्रापंचिकांना पेलेल असा परमार्थमार्ग दाखविण्याचे कार्य अधिकच जोराने केले. सदाचार, नामस्मरण, सगुणोपासना, अन्नदान आणि सर्वांबद्दल प्रेमभाव, यांवर त्यांचा विशेष भर होता. सन १८९० पासून श्रींचे वास्तव्य प्रामुख्याने गोंदवले येथेच राहिले. त्यांच्याकडे येणा येणाऱ्यांची व राहणाऱ्यांची संख्या खूपच वाढली. या सर्वांना सगुणोपासनेला व सेवेला एक केंद्रस्थान असावे या हेतूने त्यांनी आपल्या वाड्यातच श्रीराम, सीता व लक्ष्मण, तसेच मारुती, यांची स्थापना केली. पुढे, भक्तमंडळींची संख्या आणखी वाढत गेल्यावर त्यांनी गावातच आणखी एक राममंदिर, एक दत्तमंदिर व एक धर्मशाळा' बांधून निवासाची सोय वाढवली. पुढे एक शनिमंदिरही बांधले. शिवाय, जागोजागी उपासना वाढावी या हेतूने भक्तांना प्रेरित करून अन्य कित्येक गावी राममंदिरांची स्थापना केली. श्रीमहाराजांनी इ. स. १९०१ मध्ये मातु:श्री गीताबाई व अनेक भक्तमंडळी यांसह काशीयात्रेसाठी प्रयाण केले. त्यात त्रिस्थळी झाल्यानंतर गीताबाईंनी अयोध्येत देह ठेवला. इ. स. १८७६ व १८९६ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात श्रीमहाराजांनी आपल्या शेतावरच नाममात्र काम देऊन हजारो लोकांना अन्न पुरविले आणि उपासमारीपासून वाचविले.

ब्रह्मस्वरूपी विलीन झालेले श्रीमहाराज हे पूर्णत्वाप्रत पोहोचलेले संत होते यात शंका नाही. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात चुकून देखिल मी पणा व माझेपणा दिसायचा नाही, हेच त्यांच्या पूर्णत्वाचे गमक होय. अर्थात स्वत:बद्दल काहीच करायचे न उरल्यामुळे केवळ जगाचे कल्याण व्हावे एवढीच त्यांची भावना होती. आपण जो ब्रह्मानंद सेवन करतो तो सर्वांनी सेवावा व धन्य होऊन जावे या एकाच प्रेरणेने प्रभावित होऊन सर्व प्रकारच्या लोकांना त्यांनी जवळ केले. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे त्यांचे चरित्र! प्रापंचिकाच्या प्रत्येक आध्यात्मिक शंकेचे उत्तर त्यांच्या चरित्रात सापडते. प्रापंचिक लोकांसाठी हा खटाटोप करीत असताना त्यांना अकारण निंदा, अपमान, छळ व कमीपणा सोसावा लागला. तरी देखील सर्वांनी भगवंताच्या मार्गी लागावे म्हणजे भगवंताचे नाम घ्यावे म्हणून शेवटचा श्वास असेतोपर्यंत त्यांनी प्रयत्न केला आणि केवळ जनहितार्थ आपले आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा व प्रेमाचा महिमा पटवून दिला.

भगवंताच्या नामाची थोरवी गाता गाता श्रीमहाराजांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण गेला. नामाचे महत्त्व सांगण्यासाठी ते जन्माला आले, नामाच्या महत्त्वाचे त्यांनी जन्मभर गायन केले. आणि आपल्या आयुष्याचे शेवटचे क्षण नामाचे महत्त्व सांगण्यातच त्यांनी घालविले. श्रीमहाराजांनी जन्मभर डोळ्यांनी नाम पाहिले, कानांनी नाम ऐकले, वाणीने नाम घेतले, मनाने नाम कल्पिले, बुद्धीने नाम चिंतिले, काया वाचा मनाने जगात एका नामाशिवाय त्यांनी दुसरे काहीच सत्य मानले नाही.

सोमवार, मार्गशीर्ष कृष्ण दशमी शके १८३५, (इ.स.२२ डिसेंबर १९१३) या दिवशी, पहाटे ५.५५ वाजता 'जेथें नाम, तेथें माझे प्राण, ही सांभाळावी खूण.' हे शेवटचे शब्द उच्चारून, या महापुरुषाने आपला देह ठेवला. जगाला प्रकाश देणारा भौतिक सूर्य पूर्वेकडे वर येऊ पहात असताना गोंदवल्याचा हा अध्यात्मसूर्य मावळला. भारतीय ऋषींची परंपरा चालविणारा हा महापुरुष अनंतामध्ये विलीन झाला.

गोंदवलेकर महाराजांनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे तो म्हणजे- तुम्ही भगवंताशी नाते जोडा, मग भगवंत म्हणजे स्वामी आपण सेवक, भगवंत माता आपण लेकरू, भगवंत पिता आपण पुत्र आणि त्याप्रमाणे मग भगवंता विषयीचे प्रेम वाढीस लागते. आपण मुलाला दत्तक घेतल्यानंतर पुत्रप्रेम वाढीस लागते. कोण नवरा आणि कोणती बायको माहिती नसते पण लग्नानंतर प्रेम वाढते. तसेच भगवंता विषयी आपण असे नाते निर्माण करून प्रेम वाढीस लावू शकतो.

जेथे राम नाम तेथे मी आहे. तुम्ही रामनामाला घट्ट धरून ठेवा मी तुमच्या जवळपासच आहे असे ते सांगून गेलेत. वर्षभरात अनेक उत्सव गोंदवले नगरीत साजरी होत असतात आपणही श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मठात जाऊन दर्शन घेऊ शकता. दोन दिवस निवासाची सोय त्या ठिकाणी मोफत आहे तसेच महाप्रसादाचा लाभ होतो.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस समाधान सुख शोधत आहे. अशावेळी दोन दिवस का होईना महाराजाचे मठात जाऊन अखंड नामजपात तल्लीत होऊन आत्म समाधान मिळवावे.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव. मोबा.८९९९५६६९१७**

## पान १ वरुन

### छंदाकडून ...

शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये उद्योजकता विकासासंदर्भात शिक्षकांचे प्रशिक्षणही घेतले जात आहेत. सरस्वती भुवन प्रशालेमध्ये बॅडमिंटन विणणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे ही चांगली बाब आहे. घरात अनेक बॅट खराब झालेल्या आहेत त्या दुरुस्त करून विद्यार्थी वापरतील. यामध्ये विद्यार्थ्यांचा कारक विकास होईल तसेच मुले स्वतः तयार केलेल्या बॅटने खेळतील त्यामुळे त्यांचा शारिरीक विकासालाही चालना मिळेल. या स्तुत्य उपक्रमासाठी मार्गदर्शक राजेभाऊ मगर व सरस्वती भुवन प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे व श्रीमती बीना पाठक जोशी यांचे अभिनंदन.

डोक्या बरोबर हात सुद्धा सशक्त व्हावेत हे शिक्षणला अपेक्षित आहे हा संदेश देण्यासाठी श्री. राजेभाऊ मगर यांनी एक सुंदर उपक्रम सरस्वती भुवन प्रशालेत घेतला. बॅट विणणे याचे प्रशिक्षण दिले उपक्रम लहान होता परंतु त्या मागील भावना मोठी होती. बीनाची कल्पना बिना कामाची कशी असेल? यासाठी प्रा. एम जी जोशी यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

### सहकारी बँकांचे ...

आणि देशभरातील सहकारी बँकांच्या सद्यस्थितीवर आणि भविष्यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

ॲड. धन्नावत यांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने योग्य असले तरी, ते सहकारी बँकिंग क्षेत्राच्या ढासळत्या विश्वासार्हतेवर आणि आर्थिक स्थितीवर बोट ठेवणारे आहे. आज महाराष्ट्रात मलकापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, नगर अर्बन बँक यांसारख्या अनेक बँकांवर रिझर्व्ह बँकेने आर्थिक निर्बंध लादले आहेत. यामुळे सामान्य ठेवीदारांचे पैसे अडकून पडले आहेत. सामान्य नागरिक रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणामुळे आपला पैसा सुरक्षित आहे या विश्वासाने सहकारी बँकांमध्ये ठेवी ठेवतो, परंतु अशा घटनांमुळे त्यांचा विश्वास डळमळीत होतो आणि त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राची आणि भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर सहकार चळवळीवर अवलंबून आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये सहकारी बँका आर्थिक कणा म्हणून काम करतात. मात्र, आज हीच सहकार चळवळ आणि बँकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निरीक्षणाने या धोक्याची जाणीव अधिक तीव्र झाली आहे. बँकांनी स्वतःची पत लोकांमध्ये निर्माण केली पाहिजे, हे न्यायालयाचे म्हणणे योग्य असले तरी, त्यासाठी सरकारने आणि रिझर्व्ह बँकेने एक मजबूत आणि आश्वासक कायदेशीर चौकट तयार करणे आवश्यक आहे.

ॲड. धन्नावत यांनी सरकारकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत, सहकारी बँकांसाठी कठोर कायदे: केंद्र आणि राज्य सरकारने मिळून सहकारी बँकांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी कठोर कायदे करावेत.

ठेवीदारांना संपूर्ण संरक्षणः सध्याच्या ठेव विमा संरक्षणाची मर्यादा वाढवून, कोणत्याही परिस्थितीत ठेवीदारांचा एकही रुपया बुडणार नाही, याची कायदेशीर हमी सरकारने द्यावी.

राजकीय हस्तक्षेप थांबवाः सहकारी बँकांच्या कारभारात होणारा अनावश्यक राजकीय हस्तक्षेप पूर्णपणे थांबवण्यासाठी कायद्यात तरतूद करावी. संचालक मंडळाची नियुक्ती आणि बँकेचा कारभार व्यावसायिक तत्त्वांवरच चालेल, हे सुनिश्चित करावे.

आरबीआयची भूमिका अधिक सक्रिय व्हावीः रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांवर केवळ निर्बंध न लादता, त्या आर्थिक अडचणीत का येतात, याच्या मुळाशी जाऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी पॅकेज जाहीर करावे.

सहकार चळवळ वाचवणे हे केवळ बँकांना वाचवणे नाही, तर ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि सामान्य माणसाच्या विश्वासाला वाचवणे आहे. सरकारने या विषयाचे गांभीर्य ओळखून तातडीने ठोस पावले उचलावीत आणि महाराष्ट्रासह देशभरातील सहकारी बँकांना आणि पर्यायाने कोट्यवधी ठेवीदारांना संरक्षण द्यावे, असे आवाहन ॲड. धन्नावत यांनी केले.

### शिक्षणासोबतच...

मंथा फुके, मुथा फाउंडेशनच्या श्रीमती मुळे, के. आर. डंबाळे, कैलास चौथे, बालाजी मदन, परमेश्वर कठोरे, बाबासाहेब शिंदे, दिपक मोहिते, श्री. पिटलार, सौ. कल्पना पाटील, सौ. मिरा जगदाळे, रवि मेहत्रे, मुकेश देशपांडे यांनीही मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी डी. एन क्षिरसागर, बाबासाहेब जुंबड यांचेही मागदर्शन लाभत आहे.

या कार्यशाळेत अध्यापन कौशल्य, मूल्याधिष्ठित शिक्षण, संवाद कौशल्य आणि वर्गव्यवस्थापन या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात येत आहे. या चारही टप्प्यामध्ये आनंददायी खेळ व विविध उपक्रमामुळे चैतन्य निर्माण झाले असून, पहिली ते आठवीपर्यंतच्या शिक्षकांना नवसंजिवनी मिळेल, असा विश्वास सुलभक मार्गदर्शक जगत घुगे यांनी व्यक्त केला. कार्यशाळेला तालुक्यातील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती सांभाळा

मित्रांनो आपल्याला माहित आहे की, कोणताही माणूस त्याच्याकडे असणाऱ्या अमाप धनसंपत्तीने मोठा नाही ठरत तर त्याच्याकडे असणाऱ्या जनसंपत्तीने तो मोठा ठरतो. एखाद्याकडे भरपूर पैसा आहे, आलिशान गाडी व आलिशान बंगला आहे. त्याच्याकडे फार मोठा उद्योग आहे, त्याच्याकडे खूप जमीन व जुमला आहे. त्याच्याकडे अनेक मोठमोठ्या संस्था व कारखाने आहेत, म्हणून तो माणूस धनाच्या बळाने मोठा असेलही कदाचित परंतु धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती कधीही लाखमोलाची असते. तुमच्याकडे कितीही पैसा असून काही उपयोग होणार नाही. तुमच्या पाठीमागे माणसांचा किती मोठा माहोल आहे यावरून तुमचे मोठेपण सिद्ध होत असते. पैसा तर कामाला येतोच पण जेवढी माणसे कामाला येतात तेवढा पैसा कामाला येत नाही. पैशापेक्षा माणसे महत्वाची असतात, हे अगोदर आपण लक्षात घेऊनच पैसा कमवायचा की माणसे कमवायची हे ठरवले पाहिजे. मित्रांनो जीवनात पैसा माणसाला कधीही कमावता येतो पण जवळची माणसे एकदा तुटली तर पुन्हा त्यांना आपल्या आयुष्यात मिळवणे कठीण जाते. पैसा मेहनतीच्या बळावर कमावता येतो पण माणसे गोड बोलून व त्यांना संकटात व सुखदुःखात साथ देऊन त्यांच्यासोबत मैत्रीचे संबंध अधिक घट्ट केले जातात. आजकाल माणूस थोडाफार पैसा जवळ आला की, लगेच माणसाची बोलण्याची भाषा बदलत आहे. माणूस गर्विष्ठ व अहंकारी बनून स्वतःला श्रेष्ठ व दुसऱ्याला नीच समजत आहे. त्याला असे वाटत असते की, आता माझ्याकडे भरपूर पैसा आहे, पैशाच्या बळावर मी काहीही खरेदी करू शकतो. आता मला कोणाची गरज नाही. लोकांनी माझ्याकडे यावे पण मी लोकांकडे जाणार नाही, अशी माणसांची भावना बनते. जवळ पैसा आला की माणूस जवळची माणसे विसरतो. मित्र, नातेवाईक, भाऊबहीण व आई वडील यांना विसरून स्वतःच्या मर्जीप्रमाणे जीवन जगत असतो. मित्रांनो तुम्हाला वाटत असेल की, जीवनात पैसा आला म्हणजे कोणीही आपल्या पायाशी लोळण घेईल. पण मित्रहो तुमचा पैसा पाहून माणसे तुमच्याजवळ येतील हे खरे आहे पण ते केवळ स्वार्थासाठी व तुमच्या पैशाकडे बघून ते तुमच्याजवळ येतील. परंतु एकदा तुमचा पैसा संपला की मग मात्र ती माणसे तुम्हाला ढुंकूनही विचारत नाहीत. पण तुम्ही गोड बोलून व माणुसकीचे व्यवहार जपून कमावलेली माणसे निस्वार्थ भावनेने तुम्हाला मदत करतील, तुमच्या सुखदुःखात धावून येतील, तुम्हाला संकट काळात व अडीअडचणीत आर्थिक मदत करतील. तुमच्या वाईट काळात तुम्हाला खंबीरपणे साथ देतील पण केवळ श्रीमंतीला बघून जवळ येणारी माणसे ही तुमच्याकडे जोपर्यंत पैसा आहे तोपर्यंतच तुमच्या सोबत असतील जेव्हा तुमचा पैसा संपून जाईल तेव्हा ती माणसे सुद्धा तुमच्या पासून दूर जातील, तुम्हाला पुन्हा विचारणार सुद्धा नाहीत. ही मानसिकता आजकालच्या लोकांची झाली आहे. स्वतःचा स्वार्थ पाहून जवळ येणारी माणसे हे आपल्या सुखदुःखात धावून येत नाहीत, आपल्या संकटात व वाईट काळात आपल्या सोबत राहत नाहीत. ज्या माणसांच्या मागे माणसांची संपत्ती आहे ती माणसे या पृथ्वीतलावर सर्वात महान माणसे म्हणून ओळखले जातात. माणसांची संपत्ती जर आपल्या पाठीमागे असेल तर आपण निवडणुकीत सुद्धा सहजपणे विजयी होऊ शकतो. पैशाच्या बळावर आपण काहीही खरेदी करू शकतो पण जिवाभावाची माणसे खरेदी करू शकत नाही. म्हणून माणसांना खूप खूप जपा व डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवून माणसांशी गोड गोड बोला. मग बघा तुमच्या मागे माणसांचा किती मोठा थवा असेल. आणि जर तुमच्या मागे माणसांचा माहोल मोठा असेल तर तुमचा दरारा देखील गावात भारी असेल. जीवनात माणसाने माणसे कमवायला शिकले पाहिजे. कारण जिथे पैसा कामाला येत नाही तिथे माणसे कामाला येतात. मित्रांनो तुम्ही जर मेलात आणि तुमच्या अंत्यविधीला सर्व गाव आले आणि तुमच्या नसल्याने ते ढसाढसा रडले तर समजा तुमच्या जीवनाचे सार्थक झाले. माणसाचे मोठेपण जर बघायचे असेल तर त्याच्या अंत्यविधीला बघा. ज्या माणसाच्या अंत्यविधीला माणसांची रांग लांबच लांब असते, तो माणूस खरच खूप महान व दिलदार आहे म्हणून समजायचे. मेल्यानंतरही लोकांच्या मनावर कायमचे अधिराज्य गाजवायचे असेल तर मित्रांनो माणसांशी गोड बोला, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जा, निस्वार्थ भावनेने एकमेकांना मदत करा, कडू बोलून माणसे तोडण्यापेक्षा गोड बोलून माणसे जोडा.. चांगले काहीतरी काम करून दाखवा जेणेकरून आपण मेल्यानंतरही लोकांनी आपले नाव काढले पाहिजे की, हा माणूस खूप चांगला, दिलदार व मायाळू होता. मित्रांनो आपण मेल्यावर आपल्याला सोबत काहीच घेऊन जायचे नाही. जगात येताना रिकाम्या हाताने आलोय आणि जातानाही रिकाम्या हाताने जाणार आहोत. म्हणून कोणत्याही गोष्टीचा गर्व करत बसू नका. कोणासोबतही विनाकारण भांडण तंटे करत बसू नका. सर्वांशी आपुलकीने व प्रेमाने वागा. जनहितासाठी व लोककल्याणासाठी चांगली विकास कामे करा. गरजू व निराधार लोकांना आर्थिक मदत करा. महामानव गौतम बुद्ध, रयतेचे राज्य छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी जीवनभर जनकल्याणासाठी व लोककल्याणासाठी आपले सारे आयुष्य खर्ची घातले आणि गुलामगिरीच्या खाईत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला न्याय मिळवून दिला. या महापुरुषांनी स्वतःचा फायदा कधीच बघितला नाही केवळ जनतेचा विकास हेच त्यांचे ध्येय होते म्हणून त्यांनी जनतेसाठी खूप काही कार्य केले. म्हणून मेल्यानंतरही या महापुरुषांच्या नावाचा डंका गल्लीपासून दिल्लीपर्यंत व संपूर्ण जगात वाजत आहे. यांनी जीवनात धनसंपत्तीची काहीच अपेक्षा ठेवली नाही, फक्त जनसंपत्ती हीच धनसंपत्ती समजून आयुष्यभर ते बहुजन समाजासाठी लढत राहिले, झगडत राहिले एवढेच नाही तर आपल्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत ते जनतेसाठी सदैव काम करतच राहिले. म्हणून आज मेल्यावर देखील त्यांची जयंती व पुण्यतिथी संपूर्ण जगात साजरी केली जाते. म्हणून मित्रांनो जीवनात पैशाला महत्त्व द्या पण तेवढेही नाही, महत्त्व द्यायचे जर असेल तर माणसांना महत्त्व द्या आणि माणसे तोडण्यापेक्षा माणसे जोडा म्हणजे धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती सांभाळा हेच या लेखाच्या माध्यमातून समस्त जनतेला जाहीर आवाहन करतो.

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यकाळ वर्षपूर्ती निमित्त चित्र प्रदर्शनाचा सोहळा आयोजन

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी** - आपला आदर्श, आपली प्रेरणा,नवमहाराष्ट्र निर्माण संकल्पना या विचारांवर आधारित सर्वस्पर्शी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्याच्या , विद्यमान सरकार मधील वर्षपूर्ती निमित्त, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या नामांकित वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यांचे चित्र प्रदर्शन चिंचवड येथे दिग्गज मंडळींच्या उपस्थितीत संपन्न झाले. दिनांक ५ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे प्रक्रेक्षागृह आर्ट गॅलरी चिंचवड येथे पंकज भोयर ( मंत्री, महाराष्ट्र राज्य), यांच्या हस्ते या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी गजानन जोशी मुख्य समन्वयक देवाभाऊ फांऊडेशन,महाराष्ट्र,अनुसूचित जाती/जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे,विश्वजीत देशपांडे प्रदेशाध्यक्ष परशुराम हिंदू सेवा संघ,महाराष्ट्र यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.


कर्तृत्ववान मुख्यमंत्री,गतिमान शासन व निर्णय अंमलबजावणी झालेल्या या मुख्यमंत्र्यांच्या कार्याला उजाळा मिळावा हा कार्यक्रम घेण्यापाठीमागे निष्पक्ष हेतू आहे असे मुख्य आयोजक नितीन चिलवंत यांनी सांगून सुरूवातीला मंत्री महोदयांच्या हस्ते गोमातेचे पूजन करून प्रदर्शनाची सुरुवात झाली. निमंत्रक व स्टेप्स फाउंडेशनचे संदेश मुखेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुसज्ज नियोजन केले होते त्याचा दर्शक आणि मान्यवरांनी अनुभव घेतला.

यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, प्रथमच पुणे जिल्ह्यात - पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशापद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव प्रकाशित झालेल्या बातम्यांचे चित्र प्रदर्शन आयोजित करून ते सर्वांसाठी खुले केल्याबद्दल स्टेप्स फाउंडेशनचे आणि संपूर्ण टीमचे कौतुक. असे कार्यक्रम प्रत्येक जिह्यात झाले पाहिजेत जेणेकरून कर्तव्यदक्ष मुख्यमंत्र्यांच्या कार्याला उजाळा मिळेल

गोरक्ष लोखंडे (अनुसूचित जाती/जमाती आयोग सदस्य, सचिव दर्जा) यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या चित्र प्रदर्शनातील सर्वात जास्त आवडलेला फोटो म्हणजे, माझ्या राज्यातील गरीब आणि शेवटचे घर जोपर्यंत सुखी नाही ते राज्य सुखी नाही! असा विचार करून रयत सुखी ठेवण्यासाठी कार्य करणारे मराठी मनाचा मानबिंदू या मातीने आम्हाला दिला, असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक होतानाचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे चित्र जास्त भावले

गौरवशाली मुख्यमंत्री देवाभाऊ हे नवमहाराष्ट्र निर्माणाची एक प्रेरणा असून,गत वर्षभरात विविध विभागांत महत्वपूर्ण विषयांवर घेतलेले सर्व निर्णय हे जनहिताचे आहेत,उद्योग क्षेत्रात झपाट्याने वाढणारी यंत्रणा ही देवाभाऊंच्या दृष्टीतील विकसित भारताची वाटचाल असल्यामुळे महाराष्ट्र आता थांबणार नाही - विकास आता लांबणार नाही देवाभाऊ फाऊंडेशनचे बमुख्य समन्वयक गजानन जोशी बोलताना म्हणाले.

स्टेप्स फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या महाराष्ट्राचे प्रभावशाली मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वर्षभरातील कार्यकाळातील विकासकामांचा सर्वांगीण आढावा सादर करणाऱ्या विशेष विकास प्रदर्शनाचा लाभ विद्यार्थी आणि सामन्य नागरिकांनी घेतला. प्रदर्शनामध्ये महत्त्वपूर्ण



प्रकल्पांचा, निर्णयांचा आणि जनकल्याणकारी उपक्रमांचा दस्तऐवजी स्वरूपात व्यापक परिचय यामधून दर्शकांना झाला. दर्शकांसाठी हे केवळ चित्र प्रदर्शन नव्हे तर ज्ञानदर्शन होते अशी भावना काही उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. असे हे अनोखे आणि प्रेरणादायी चित्र प्रदर्शन सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत नागरिकांना पाहण्यासाठी दिवसभर सुरू होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्ष आणि संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी, व सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यामध्ये राज्य मंत्री पंकज भोयर यांच्या सह गोरक्ष लोखंडे (सचिव दर्जा, सदस्य : अनुसूचित जाती जमाती आयोग), अमेय जोशी, जागृती धर्माधिकारी, निलेश नवले, तुषार हिंगे, दिपाली जोशी, संदीप पोलकम, मुकुंद घोलप, प्रवीण शेलार, संदीप मोरे, अजिंक्य पोतदार, सचिन बंदी (सरचिटणीस भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर), कैलास कुटे (अध्यक्ष भाजपा पिंपरी विधानसभा), केतकी कुलकर्णी, एम. वेंकटेश, दिनेश यादव, सुप्रिया चांदगुडे, मुक्ता पुंडे, राहुल अग्रवाल, साधना मळेकर, जयदीप खापरे, संदीप थोरात, अरुण पाडुळे, विशाल लोखंडे, काशिनाथ ठाकूर, संदीप चव्हाण, प्रदीप रॉय, रेशु अग्रवाल,भक्ती मुखेडकर, रेश्मा चिलवंत, अश्विन गुडसूरकर, भूषण तरकसे, लिओन कुटीनो, व्यंकटेश सोमवंशी, विजय चव्हाण, भावना नर्सिंगोजू , शिवकुमारसिंह बायस, यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नितीन साळी यांनी केले.

## कौचलवाडी शिवारात गांजाच्या शेतीवर पोलीसांचा छापा

### एक कोटीचा मुद्देमाल जप्त



**जालना । प्रतिनिधी** - अंबड तालुक्यातील कौचलवाडी गावभागातील शेतात गांजाच्या शेतीवर अंबड पोलीस व एटीएस पथकाने कारवाई करुन तब्बल एक कोटीचा गांजाचे झाडे पकडली आहेत. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई आज ४ डिसेंबर रोजी उशीरा करण्यात आली. अंबड तालुक्यातील कौचलवाडी या गावात एका व्यक्तीने गांजाची शेती केली असून सध्या गांजाची काढणी सुरु आहे, अशा माहितीवरून सहायक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड, पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे, सहाय्यक फौजदार शेख अकतर, पोलीस हवालदार विनोद गडदे, मारुती शिवरकर, कैलास कुरेवाड, यशवंत मुंढे, राधाकृष्ण हरकळ, दीपक बडूरे यांनी कौचलवाडी येथे जावून शोध घेतला. ढवळीराम बारकू चरावंडे यांच्या शेतात गट क्र. ७८७ कौचलवाडी शिवार येथे जवळपास ४ क्विंटल गांजाची झाडे पाला, फुले काढणी करतांना ती सुकविताना तसेच उभी झाडे असा मुद्देमाल मिळून आल्याने पंचनामा करून तो ताब्यात घेण्यात आला. हा मुद्देमाल सुमारे एक कोटीच्या अधिक असू शकतो, असेही सांगण्यात येत आहे. अंबड पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येत आहे.



**शहरातील आयेशा लॉन्स येथे राहत सोशल ग्रुपच्यावतीने आयोजित मुस्लीम सामुहिक विवाह सोहळा पुर्वतयारीची पाहणी करतांना अध्यक्ष शेख अफसर, बदर चाऊस, लियाकत अली खान, शेख महेबुब आदी. ( छाया/जावेद तंबोली)**




# बहुजन चळवळीचे मार्गदर्शक प्रा. सोपान तेलगड यांच्यावर राष्ट्रवादीची मोठी जबाबदारी

## जालना राष्ट्रवादी शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** बहुजन चळवळीतील ज्येष्ठ, मार्गदर्शक व सर्वमान्य नेतृत्व आदरणीय शिवश्री प्रा. सोपानराव तेलगड यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) - जालना शहर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून जिल्हाध्यक्ष मा. आ. अरविंद अण्णा चव्हाण यांच्या शुभहस्ते नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीने पक्षाच्या जालना शहरातील संघटन बळकटीला नवे बळ मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांत व्यक्त होत आहे.



नवनियुक्त कार्याध्यक्ष प्रा. तेलगड हे बहुजन चळवळीतील प्रमुख विचारवंत, अभ्यासू नेतृत्व आणि समन्वयक म्हणून ओळखले जातात. त्यांनी गेली अनेक वर्षे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानामुळे त्यांची निवड निश्चितच योग्य ठरल्याचे मत पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केले.

नियुक्ती कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी प्रा. तेलगड यांच्यावर दाखवलेला विश्वास व्यक्त करताना सांगितले की, जालना शहरातील पक्ष संघटनाला अधिक गतिमान करण्यासाठी अभ्यासू, दूरदृष्टी असलेले नेतृत्व आवश्यक होते. प्रा. तेलगड यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक वाढ अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रा. सोपानराव तेलगड यांनीही पक्षाने दिलेल्या जबाबदारीस न्याय देण्याचे आश्वासन देत सांगितले की, बहुजन समाजाच्या प्रश्नांवर ठोस भूमिका, कार्यकर्त्यांचे सबलीकरण आणि समाजाभिमुख कार्यक्रमांच्या माध्यमातून जालना शहरातील पक्षाची ताकद वाढवणे हेच माझे प्राधान्य असेल.

दरम्यान, या नियुक्तीचे शहरातील विविध राजकीय-सामाजिक संघटनांकडून स्वागत करण्यात येत असून प्रा. तेलगड यांना सर्वत्रून अभिनंदन संदेशांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे जालना शहरातील राजकीय आणि सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये पोलिस विभागाचा जनजागृती कार्यक्रम

## १८० विद्यार्थ्यांना महिला सुरक्षा, सायबर क्राईम व अमली पदार्थांबाबत मार्गदर्शन





**जालना । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद हायस्कूल, नूतन वसाहत येथे जालना पोलिस विभागातर्फे आज रोजी जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. पोलिस अधीक्षक अजय बंसल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलिस ठाणे, दामिनी पथक तसेच जनजागृती वाहनाच्या सहाय्याने हा कार्यक्रम पार पडला.

स.पो.नि. आरती जाधव यांनी सुमारे १८० विद्यार्थ्यांना महिला सुरक्षा, सायबर क्राईमपासून बचाव, अमली पदार्थांचे दुष्परिणाम, तसेच पोलिस हेल्पलाईन क्रमांक याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना सायबर फसवणूक ओळखण्यापासून ते ऑनलाइन सुरक्षिततेपर्यंत विविध महत्त्वाच्या टिप्स देण्यात आल्या.

यावेळी पोलिस अंमलदार गौतम बोबडे यांनी विद्यार्थ्यांना माहितीपर व्हिडिओ दाखविले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी या व्हिडिओंना उत्स्फूर्त प्रतिसाद देत पोलिस दलाच्या जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले.

शाळा प्रशासनाला पोलिस अधीक्षक कार्यालयातर्फे 'सुरक्षा मंत्र' हे महत्त्वपूर्ण माहितीपुस्तक प्रदान करण्यात आले.


या कार्यक्रमाला स्वामी विवेकानंद हायस्कूलचे श्री पाटील, श्री वानखेडे, श्री खोजे, श्री काकडे, श्री गायकवाड, श्री जाधव, श्री ढोणे, श्री भुजंग, श्री चोरमले, श्री जयरंगे, श्री कदम, श्री कानडे, भिसे मॅडम, चेके मॅडम, थोरात मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा, जागरूकता आणि जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्यावतीने अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्यावतीने मस्तगड येथील स्मारकास अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली. जय भीम' घोषणांनी परिसर दुमदुमला.

या प्रसंगी बोलताना सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटना मूल्यांमुळे आज आपण समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या विचारांसह उभे आहोत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, समता आणि न्याय पोहोचवणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली असेल. आजचा दिवस श्रद्धेचा असला तरी त्याचबरोबर तो आपल्या कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे.

या कार्यक्रमाला जय बजरंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विपुल राय, चंद्रकांत रत्नपारखे, सुभाष सातपुते, बाबू भोसले, सचिन घोडे, संतोष जाधव, विशाल कांबळे, संतोष कुरील, किशोर कुरील, सुशील यादव, बबन दाभाडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता व जयभीमच्या घोषणांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आली.



# विद्यार्थ्यांनो यश मिळवायचे असेल तर अपयशाला घाबरू नका - पीएसआय पवार



**जालना । प्रतिनिधी -** अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे 'संस्कार दिन ' या उपक्रमांतर्गत असा घडलो मी या विषयावर विचार मांडताना आयुष्य हे चढउतारांनी भरलेले असून यशापर्यंत जाण्यासाठी अपयशाला घाबरून जायचे नाही असा सल्ला प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पो.उ. नि. श्री दिगंबर पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला. यशस्वी होण्यासाठी व्यक्तीची जात, धर्म, वय ,उंची ,रंग, रूप या गोष्टी महत्त्वाच्या नसून तुमच्यातील ऊर्जा महत्त्वाची आहे. सकारात्मक विचार,प्रचंड मेहनत व विचारातील निर्धार तुमच्या यशाचं मूळ आहे. विद्यार्थ्यांनी या जडणघडणीच्या काळात सोशल मीडियाचा वापर कमी करून प्रचंड वाचन केले पाहिजे असे विचार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मांडले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांनी राष्ट्राला उच्च विभूषित,कुशल त्याचबरोबर चारित्र्यसंपन्न मनुष्यबळाची गरज आहे. वर्गामध्ये दैनिक अभ्यासक्रम पूर्ण करताना सांस्करिक मूल्य बिंबवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. म्हणून अशा स्वतंत्र कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांची नैतिक मूल्याची गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न यासारख्या कार्यक्रमातून केला जातो असे मत मांडले. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी विद्यार्थ्यांनी आपण कोण आहोत यापेक्षा काय आहोत हे सिद्ध केले पाहिजे असा महत्त्वाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रिया धुमाळ व संच यांनी सारेगामा या स्वागत गीताने केली. यावेळी पाहुण्यांचा परिचय डॉ. शंकर तिकांडे यांनी करून दिला.

या कार्यक्रमास पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, डॉ. सुदर्शन तारख,प्रा. महादेव माने,प्रा.वैशाली मगरे, डॉ विजयकुमार कुमठेकर, प्रा.शौकत शेख,प्रा.शोभना भालेराव यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकुश गडदे यांनी तर आभार प्रा.बाळासाहेब लुंगाडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. दादासाहेब शिंदे, प्रा.सपना शहाणे, प्रा. गणेश गुंजाळ, प्रा.चंद्रकांत लाटेकर प्रा.कपिल घोलप,प्रा. बालाजी सूर्यवंशी प्रा.शुभांगी राऊत, प्रा. कुलकर्णी, प्रा. नागवे प्रा.सुमा आढाव यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडगाव पत्रा तांडा येथे नसाबासाठी उपस्थित राहा- शाम पवार

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील वडगाव पत्रा तांडा या गावातील मा.सरपंच मुरलीधर बंडू जाधव,उपसरपंच विनायक वाछू राठोड,माजी पोलीस पाटील नामदेव गोबरा जाधव व आताचे पोलीस पाटील आकाश गंभीर राठोड,गावातील ज्येष्ठ नागरिक सोमा महाराज राठोड व सर्व लोकांना व तमाम नागरिकांना व तरुणांना जेष्ठ आणि वृद्ध व्यक्तीस आवाहन आहे की,दिनांक ०७/१२/२०२५ रोजी रविवारी सकाळी ९.०० वाजता वडगाव पत्रा तांडा येथील जमिनीचा वाद मागिल दहा ते पंधरा वर्षापासून न्यायालयात खूप दिवसापासून प्रलंबित होता व आजही आहे.त्या करिता पंचा समक्ष अंतिम निर्णय घेण्यासाठी वडगाव पत्रातांडा येथील हरेराम बाबा मंदिर व सेवालाल नगर तांडा येथे नसाबाचा निर्णय अंतिम घेण्यात येणार आहे.तरी आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शाम गबरु पवार,बळीराम गबरु पवार,विठ्ठल सवाईराम राठोड, एकनाथ सवाईराम राठोड रा.वडगाव पत्रा तांडा तालुका जिल्हा जालना यांनी केले आहे.



**जालना मस्तगड येथील भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करताना धर्मवीर छावा संघटनेचे जालना जिल्हा संपर्कप्रमुख सुभाष देवडे जालना जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण गाडेकर व अनेक उपस्थिती होती,**

# जेईएस महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिवस साजरा



**जालना । प्रतिनिधी -** जेईएस महाविद्यालय, जालना येथे महापरिनिर्वाण दिवस अत्यंत श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश लहमाटे, प्रा. किशोर तापडिया तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बाबासाहेबांच्या कार्य, विचार, संविधाननिर्मितीतील योगदान आणि सामाजिक परिवर्तनाच्या त्यांच्या मिशनची आठवण करून देण्यात आली. उपस्थितांनी सामाजिक बांधिलकी, समानता आणि संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# बसवकल्याण येथील अनुभव मंडप उत्सवात शरण सन्मानाने राजेंद्र वांजुळे सन्मानीत

**बसवकल्याण । प्रतिनिधी -** कर्नाटक येथे ४६ वा राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सव मोठ्या उत्सवात संपन्न झाला.अनुभव मंडप बसवकल्याण अध्यक्ष तथा महाराष्ट्र बसव परिषद संस्थापक अध्यक्ष प.पू. डॉ.बसवलिंग पट्टदेवरु अप्पाजी यांच्या हस्ते या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध भागातील शरणाचा महात्मा बसवण्णा यांनी बाराव्या शतकात जगातील पहिल्या लोकशाही संसदेचे प्रारुप असलेल्या अनुभव मंटपाची स्थापना केली. ७७० शरणांच्या सामूहिक संवादातून वचन साहित्य निर्माण झाले. त्यातून घडून आलेली कल्याण क्रांती ही देशातील दुःख, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, अस्पृश्यता आणि लिंगभेद संपुष्टात आणून सकल जीवात्म्यांच्या कल्याणासाठी कार्यरुपात आणलेली अप्रतिम अशी नवीनतम क्रांती होती. या क्रांतीच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण महाराष्ट्रात कार्य करीत आहात. बसवादी शरणांचा विचार समाजाभिमुख व्हावा म्हणून आपण निरंतरपणे कार्य करीत आहात. शरणांचा कायक व दासोह विचार आपण आपल्या नित्य जीवनात आचरणात आणून खऱ्या लिंगायत धर्माची ओळख करुन देत आहात. आपल्या या सेवेच्या सन्मानार्थ शरणांची कायक भूमी, क्रांतीभूमी असलेल्या ऐतिहासिक बसवकल्याण नगरीत संपन्न होत असलेल्या 'अनुभव मंटप उत्सवात जालना जिल्हातील लिंगायत चळवळीत काम करीत असलेलं व्यक्तिमत्व राजेंद्र वांजुळे यांचा प.पू. डॉ.बसवलिंग पट्टदेवरु अप्पाजी यांच्या हस्ते विशेष शरण सन्मानाने सन्मानित करण्यात आले. समारंभाचे उद्घाटक म्हणून आंध्रप्रदेश राज्याचे महामहिम राज्यपाल मा. सय्यद अब्दुल नझीर साहेब, स्वागताध्यक्ष म्हणून कर्नाटक सरकारचे कॅबिनेट मंत्री श्री ईश्वर खंड्रेजी उपस्थित होते.यावेळी बसवपिठावर गुरुवर्य सिध्दरामेश्वर आप्पाजी बसवकल्याण,गुरुवर्य प्रभुदेव आप्पाजी बिदर, गुरुवर्य कोरनेश्वर आप्पाजी आळंद,गुरुवर्य गुरुबसव पट्टदेवरू आप्पाजी भालकी यांच्यासह विविध भागातून गुरुमाऊली,प्रबोधनात्मक भूमिका मांडणारे विचारवंत, लोकप्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थिती होती.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.